## प्रेसनोट

ला.प्र.वि. अहिल्यानगर
दि.२६/०२/२०२६

**लोकसेवक श्री. कैलास विठठल खाडे,वय— ३३ वर्षे, पद— महसुल सहायक,वर्ग—३, तहसिल कार्यालय, संगमनेर ता.संगमनेर जि. अहिल्यानगर यांनी १०,०००/— रूपये लाचेची मागणी करुन सदर लाच रक्कम स्विकारल्याने त्यांचे विरूद्ध भ्रष्टाचार प्रतिबंध कायदयान्वये कारवाई केले बाबत...**

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रतिबंधक विभाग/घटक | नाशिक /अहिल्यानगर. |
| पोलीस ठाणे, गुन्हा नोंद कमांक | संगमने शहर पोलीस स्टेशन येथे गुन्हा दाखल करण्याची प्रकिया चालु आहे. |
| कलम व गुन्हा दाखल दिनांक | भ्रष्टाचार प्रतिबंध अधिनियम सन १९८८ चे कलम ७ प्रमाणे |
| आरोपीचे लोकसेवक नाव, वय व कार्यालय | कैलास विठठल खाडे वय— ३३ वर्षे, पद— महसुल सहायक, तहसिल कार्यालय, संगमनेर ता.संगमनेर जि. अहिल्यानगर वर्ग—३ |
| मागणी केलेली लाचेची रक्कम | १३,०००/— रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/— रूपये लाचेची मागणी केली. |
| स्विकारलेली लाचेची रक्कम | १०,०००/— रूपये |

**थोडक्यात हकिकत**

प्रस्तुत बातमीतील हकिकत अशी की, तक्रारदार हे त्यांचे परिवारासह राहण्यास असुन त्यांचे वडीलोपार्जित शेतजमीनीचे खातेवाटप करण्यात आले आहे व ७/१२ उता—यावर स्वतंत्र पोट हिस्स्यांची नोंद तक्रारदार यांचे वडील व ३ चुलते यांचे नावाने लावण्यात आलेली आहे.७/१२ उता—याचे संगणकीकरण करताना तक्रारदार यांचे वडीलांचे व चुलत्यांचे नावावर असलेल्या शेतजमीनीचे ७/१२ उता—यावर तक्रारदार यांचे आत्यांची नावे लागली व पुन्हा एकत्र गट झाल्याचा दिसुन आल्याने सदर शेतजमीनीच्या ७/१२ उता—यावर चौघा भावांची स्वंतत्र पोट हिस्स्या प्रमाणे नोंद करणेबाबत तक्रारदार यांचे चुलत्याचे नावे तहसिल कार्यालय,संगमनेर येथे अर्ज केला होता.सदर अर्जामधील दिनांक ०५/०२/२०२६ रोजीच्या सुनावणी मध्ये तहसिल कार्यालय,संगमनेर येथे तक्रारदार यांचेसह त्यांचे वडील,तीन चुलते व तीन आत्या हजर होत्या व सुनावणी दरम्यान आरोपी लोकसेवक खाडे हे हजर राहुन त्यांनी तक्रारदार यांचे चुलत्यांचे अर्जप्रकरण तहसिलदार,संगमनेर यांचेसमक्ष सादर केले होते.त्यानंतर दिनांक ११/०२/२०२६ ते २३/१२/२०२६ पावेतो आरोपी लोकसेवक खाडे यांनी तक्रारदार यांना फोन करून त्यांचेकडे त्यांचे चुलत्यांनी दाखल केलेल्या अर्जप्रकरणाच्या सुनावणी मध्ये मदत केल्याचे मोबदल्यात तसेच तहसिलदार,संगमनेर यांनी सदर अर्जप्रकरणामध्ये दिलेल्या निकालाच्या आदेशाची प्रत देण्याचे मोबदलयात १३,०००/— हजार रूपये लाचेची मागणी करत असलेबाबतची तक्रार ला.प्र.वि.कार्यालयात दिनांक २५/०२/२०२६ रोजी

तक्रारदार यांनी दिलेल्या तक्रारीप्रमाणे दिनांक २६/०२/२०२६ रोजी तहसिल कार्यालय येथे लाचमागणी पडताळणी वेळी यातील आरोपी लोकसेवक कैलास विठठल खाडे महसुल सहायक, तहसिल कार्यालय, संगमनेर जि. अहिल्यानगर यांनी तक्रारदार यांचेकडे तक्रारदार यांच्या चुलतांच्या नावे दिलेल्या अर्जामधील सुनावणीमध्ये मदत केल्याचे मोबदल्यात व तहसिलदार संगमनेर यांनी सदर अर्जामध्ये दिलेल्या निकालाच्या आदेशाची प्रत देण्याकरीता १३,०००/— रूपये लाचेची मागणी करून तडजोडीअंती १०,०००/— रूपये लाचेची मागणी करून स्विकारण्याची संमती दर्शवली व दिनांक २६/०२/२०२६ रोजी यशस्वी सापळा कारवाई दरम्यान आरोपी लोकसेवक खाडे यांनी तहसिल कार्यालय, संगमनेर येथील शेजारील जय श्रीराम चहाच्या टपरीजवळ तक्रारदार यांचेकडुन पंचासमक्ष १०,०००/— रुपये लाचेची रक्कम स्विकारली आहे.

१) सापळा अधिकारी:— पोलीस निरीक्षक श्री, राजु आल्हाटे ला.प्र.वि.अहिल्यानर.
२) पर्यविक्षण अधिकारी:— पोलीस उप अधिक्षक श्री.अजित त्रिपुटे,मो.नं. ८३२९७०१३४४
३) सापळा पथक:— १) पोना/७०९ चंद्रकांत भिमसेन काळे २) पोकॉ/२५७९ किशोर विठठल कुळधर ३) पोकॉ/२८१७ वैभव बबन सुपेकर ४) चालक पोहेकॉ/दशरथ भिमराव लाड सर्व नेम— ला.प्र.वि. अहिल्यानर
४) तपासी अधिकारी:— पोलीस निरीक्षक श्रीमती छाया देवरे मो.नं. ८७८८२१५०८६

**मार्गदर्शन**

१) मा.श्री.भारत तांगडे पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक
२) मा.श्री.माधव रेड्डी, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.
३) मा.श्री.सुनिल दोरगे, अपर पोलीस अधीक्षक, ला.प्र.वि.नाशिक परिक्षेत्र, नाशिक.

लाचलुचपत प्रतिबंधक विभागातर्फे नागरिकांना अहवान करण्यात येते की, भ्रष्टाचारा संबंधी काही माहिती असल्यास अगर लाचमागणाऱ्या लोकसेवका बद्दल तक्रार असल्यास लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, महाराष्ट्र राज्य यांच्याशी संपर्क करावा.

संपर्क पत्ता:— लाचलुचपत प्रतिबंधक विभाग कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, टि.व्ही सेंटर समोर, सावेडी, अहिल्यानगर

संकेत स्थळ:— acb.maharashtra.gov.in
ई मेल:— spacbnashik@mahapolice.gov.in, dyspacba.nagar @ gmail.com
ऑनलाईन तक्रार:— :— acbmaharashtra.net
टोल फ्री क:— 1064
दुरध्वनी क:— 0241—02423677 व्हॉटस अप कमांक:— 9168641064